

# अंळिबी लागवड व्यवसाय निर्मिती

| | | |
|---|---|---|
| **उद्योजक शेतकरी महीलेचे नाव** | : | **सौ. इंदिरा शंकरराव कांबळे** |
| पत्ता | : | मु. कोल्ही क्र.२ पो. फाळेगाव ता. बाभुळगाव<br>जिल्हा: यवतमाळ |
| संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक | : | ७७४४०८४३१९ |
| वय | : | ४९ वर्ष |
| शिक्षण | : | इयत्ता २ री |
| जमीन धारकता | : | ०.८० आर |

## १. कृषि विज्ञान केंद्राचे अंळिबी लागवड व्यवसायाकरीता मार्गदर्शन

- कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ येथे दि. २१.११.२०१४ रोजी आयोजित मशरूम (अळंबी) लागवड तंत्रज्ञान विषयावरील प्रशिक्षणामध्ये सक्रिय सहभाग घेवुन प्रशिक्षण पुर्ण केले.
- कृविके च्या प्रशिक्षणामध्ये शास्त्रज्ञांकडून मशरूम (अळिंबी) विशेषत: निर्जंतुकिकरण व तापमान, आर्द्रता आणि चांगल्या प्रतिचे बियाणे या विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

## २. अळिंबी लागवड व्यवसायातून साध्य

- यशस्वीपणे मशरूम व्यवसायाची सुरवात जानेवारी २०१५ पासून केली आहे.
- कच्च्या शेडमध्ये प्युरोटस फलोरीडा (धिंगरी अळिंबी) जातीचे मशरूम ची लागवड करीत आहे व विक्री चे दर ताजे मशरूम १०० ग्रॅम चे पॅकेट ४० रू. दराने विकत आहे व ड्राय मशरूम २० ग्रॅम चे पाकीट ३० रू. दराने विकत आहे. आणि मशरूम पापड १०० रू. दराप्रमाणे विकत आहे तसेच मशरूम पावडर २० ग्रॅम चे पाकेट रू. ३० दराने विकत आहे.
- कच्चे शेडचे क्षेत्रफळः– ५० x १५ असुन त्यामध्ये मशरूम बेडसंख्या १५०० असून व्यवस्थापन घरगुती परंतु शास्त्रीय पध्दतीने करीत आहे.
- वर्षाकाठी मशरूमच्या पूर्णपणे ६ बॅचेस पुर्ण केल्या जातात त्यामध्ये एका मशरूमच्या बॅच निर्मिती करीता अंदाजे बेड निर्मिती, मजुरी व व्यवस्थापन, वीज बिल करीता रू. २३०००/– खर्च येतो. याप्रमाणे वर्षाकाठी रू.१,३८,०००/– खर्च ६ बॅचेस करीता येतो. एकुण नफा २,८८,०००/– येत असुन खर्च वगळता वर्षाकाठी निव्वळ नफा रू. १,५०,०००/– या व्यवसायातून उत्पन्न मिळत आहे.

- पुढील बॅचेस वाढविण्याच्या दृष्टिकोणातून कृषि विज्ञान केंद्राकडून सोलर टनेल ड्रायर मशीनचे नियोजन प्रस्तावित आहे तसेच इतर शेतकऱ्यांना या व्यवसायाचा प्रचार व प्रसार करण्याचे काम करीत आहे. यापासून पुरक व्यवसाय स्वंयरोजगार निर्मीती करीता ग्रामीण भागातील युवक युवतीना प्रोत्साहीत करत आहे.





